आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ऑगस्ट २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत कर्तव्य भवनाचं उद्घाटन

- रेपो दर ५ पूर्णांक ५ दशांश टक्क्यांवर कायम ठेवण्याचा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीचा निर्णय

- भारताने रशियाकडून खनिज तेल आयात बंद केल्याचा अमेरिकेचा दावा  रशियानं फेटाळला

**आणि**

- उत्तराखंडमधे उत्तरकाशी जिल्ह्यात मदत आणि बचावकार्य सुरू;  पुरात ११ जवान बेपत्ता, तर १३० नागरिकांना वाचवण्यात यश

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत कर्तव्यपथावर बांधण्यात आलेल्या कर्तव्य भवनाचं उद्घाटन झालं. सेंट्रल व्हिस्टा इमारत संकुलाचा व्यापक विस्तार करून कर्तव्य भवन ३ उभारण्यात आलं आहे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणि गतीमानता आणण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या केंद्रिय सचिवालयांच्या इमारतींमधली ही पहिली इमारत आहे. या इमारतीत गृह, परराष्ट्र व्यवहार, ग्रामीण विकास, एमएसएमइ, तेल आणि नैसर्गिक वायू यासारख्या काही प्रमुख मंत्रालयांची कार्यालयं असतील. दरम्यान, यानिमित्त आज संध्याकाळी साडे सहा वाजता आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री उपस्थितांना संबोधित करतील.

**<><><><><>**

विरोधी पक्षानं वेगवेगळ्या मुद्द्यांवरून केलेल्या घोषणाबाजीनंतर संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब झालं.

लोकसभेचं कामकाज सकाळी ११ वाजता सुरु झालं तेव्हा सभापती ओम बिर्ला यांनी हिरोशिमा दिनानिमित्त जपानमधे १९४५ मध्ये झालेल्या अणुबॉम्ब हल्यात मरण पावलेल्यांना आदरांजली वाहिली. तसंच, सदनाचे माजी सभापती गुरदयाल सिंग धिल्लो यांना त्यांच्या जयंतीनिमित्त पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला, मात्र विरोधकांनी बिहारमधल्या मतदारयाद्या पुनरीक्षण मुद्द्यावरून घोषणाबाजी सुरु केल्यानं सदनाचं कामकाज सुरुवातीला दुपारी १२ आणि त्यानंतर २ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं.

**राज्यसभेत** कामकाज सुरु झाल्यावर सर्व सदस्यांनी सदनाचे माजी सदस्य दिवंगत सत्यपाल मलिक यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी आपले मुद्दे उपस्थित करत त्यावर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. उपाध्यक्ष हरिवंश यांनी शून्य प्रहारात सार्वजनिक महत्वाच्या मुद्दयांवर चर्चेत व्यत्यय आणू नये, असं आवाहन केल्यानंतरही विरोधकांची घोषणाबाजी सुरु राहिल्यानं सदनाचं कामकाज स्थगित करण्यात आलं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने आज रेपो दर ५ पूर्णांक ५ दशांश टक्क्यांवर कायम ठेवला. त्यामुळे स्थायी ठेवींवरचे दर ५ पूर्णांक २५ शतांश टक्के तर सीमांत स्थायी सुविधांचे तसंच बँक दर ५ पूर्णांक ७५ शतांश टक्के इतकी राहतील. भारताकडून आयात होणाऱ्या वस्तुंवर अमेरिकेचे कर लागू असूनही चालू आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादनाच्या वाढीचा दर साडे सहा टक्क्यांवर कायम राहील. तसंच, चलनफुगवट्याचा दर ३ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा अंदाजही रिझर्व्ह बँकेने वर्तवला आहे.

**<><><><><>**

भारताने रशियाकडून खनिज तेल आयात बंद केल्याचा  अमेरिकेचा दावा रशियानं फेटाळला असून कोणत्याही सार्वभौम देशाला त्याच्या राष्ट्रीय हितासाठी

व्यापार भागीदाराची स्वतंत्रपणे निवड करण्याचा अधिकार असल्याचंही रशियानं म्हटलं आहे. रशियन प्रशासनाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी काल मॉस्कोमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत अमेरिका भारतावर दबाव आणत असल्याचा आरोप केला. भारत रशियाकडून खनिज तेल विकत घेऊन त्याची पुनर्विक्री करत असल्याबद्दल भारतावर वाढीव आयात शुल्क लादण्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच दिला होता, त्या पार्श्वभूमीवर रशियानं ही प्रतिक्रिया दिली आहे.

**<><><><><>**

रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर किती टक्के आयात शुल्क वाढवणार याचा उल्लेख आपण केला नाही, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ते काल व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. आज अमेरिका आणि रशियाचे अधिकारी भेटणार असून ते यासंदर्भात चर्चा करणार आहेत, असंही ते म्हणाले.

या दरम्यान, संयुक्त राष्ट्र संघाच्या माजी राजदूत निक्की हेली यांनी रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर वाढीव आयात शुल्क लावण्याच्या ट्रंप यांच्या घोषणेवर कडाडून टीका केली आहे. भारतासारख्या मजबूत सहयोगी देशांशी संबंध खराब करू नयेत असा इशाराही त्यांनी दिला.

**<><><><><>**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उद्या रशियात मॉस्को इथे वरिष्ठ रशियन अधिकाऱ्यांबरोबर भारत-रशिया सुरक्षा सहकार्यावर चर्चा करण्यासाठी बैठक घेणार आहेत. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे भारतीय वस्तुंवर २५ टक्के कर वाढवण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक होणार आहे. या बैठकीत डोवाल रशियाकडून इंधन तेल खरेदी

तसंच प्रधानमंत्री मोदी आणि अध्यक्ष पुतिन यांच्या आगामी बैठकीविषयी चर्चा करणार आहेत.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये झालेल्या भीषण ढगफुटीमुळे आलेल्या पूरस्थितीत सेनेचे ११ जवान बेपत्ता झाले आहेत, अशी माहिती राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे मोहसिन शहीदी यांनी दिली. राष्ट्रीय तसंच राज्य आपत्ती प्रतिसाद दलासह लष्कराची पथकं युद्धपातळीवर मदत आणि शोधकार्य करत आहे. आतापर्यंत १३० जणांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं असून त्यांच्यासाठी अन्न, पाणी आणि औषधाची सोय करण्यात आली आहे. दरम्यान, उत्तराखंडमधे येत्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे उत्तराखंडच्या विविध भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. तसंच डोंगराळ भागात अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी आज या परिसराची हवाई मार्गे पाहणी केली. सर्व बचावपथकं समन्वयानं काम करत असल्याचं धामी म्हणाले. दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री धामी यांच्याकडून दूरध्वनीवरून परिस्थितीचा आढावा घेतला आणि केंद्र सरकार आवश्यक ती सर्व मदत करेल, असं आश्वासन दिलं.

<><><><><>

पंजाबमध्ये मोहाली इथल्या औद्योगिक क्षेत्रात आज सकाळी झालेल्या स्फोटात दोन जणांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले. मृतांची ओळख पटली असून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे. घटनास्थळी पोलीस आणि अग्निशमन दल बचावकार्य करत असून अधिक तपास सुरू आहे.

**<><><><><>**

झारखंडमधल्या कामदारा इथं काल रात्री पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत मार्टीन केरकट्टा हा नक्षलवादी ठार झाला. त्याच्यावर पंधरा लाख रुपयांचं इनाम होतं. सुरक्षा दल जिल्हा पोलीस दल या भागात शोधमोहीम राबवत आहेत. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

**<><><><><>**

सुरक्षे संदर्भात चर्चा करण्यासाठी तसंच द्विपक्षीय सहकार्य आणखी मजबूत करण्यासाठी नवी दिल्लीत पहिला भारत-न्यूझीलंड धोरणात्मक संवाद आयोजित करण्यात आला होता. दोन्ही देशांनी सध्या सुरू असलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. या संवादात प्रशिक्षण, क्षमता बांधणी, संरक्षण उद्योग, सागरी सुरक्षा आणि बहुराष्ट्रीय सहकार्य या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याच्या मार्गांवरही चर्चा झाली.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज झारखंडमधल्या चाईबासा विशेष न्यायालयासमोर हजर राहतील. गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात २०१८ मधे केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल त्यांच्यावर खटला दाखल आहे. याआधी न्यायालयाने गांधी यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केलं होतं.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं ग्लोबल सायबर फंड घोटाळा प्रकरणात दिल्ली, नोएडा, गुरुग्राम आणि डेहराडून मधल्या ११ ठिकाणी आज सकाळी छापेमारी सुरु केली. हा घोटाळा करणाऱ्यांनी काही भारतीय आणि परदेशी नागरिकांना आपण पोलीस, तपास अधिकारी तसंच तांत्रिक सेवा पुरवणारे दलाल असल्याचं भासवून फसवल्याचं ईडीनं म्हटलं आहे. पीडितांना अटक करण्याची धमकी देऊन त्यांच्याकडून खंडणी वसूल करण्यात आली आणि त्या रकमेचं

क्रिप्टो करन्सीत रूपांतर करण्यात आलं, अशी माहिती ईडी नं दिली. आरोपींनी सुमारे २६० कोटी रुपयांच्या क्रिप्टो करन्सीची फसवणूक केली आहे.

**<><><><><>**

नोंदणी कार्ड  असलेल्या सव्वा दशलक्ष अफगाणी नागरिकांना त्यांच्या मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया एक सप्टेंबरला सुरू होईल, असं पाकिस्तान सरकारने जाहीर केलं आहे. नोंदणी कार्डाची मुदत ३० जूनला संपली त्यामुळे या नागरिकांना मायदेशी पाठवलं जात असल्याचं गृह मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

बांग्लादेशात फेब्रुवारी २०२६ मध्ये सार्वत्रिक निवडणूक घेतली जाईल असं तिथल्या अंतरिम सरकारचे प्रमुख प्रोफेसर युनूस मुहम्मद यांनी काल जाहीर केलं. आगामी रमजान सणाआधी यासंदर्भातलं पत्र आपण मुख्य निवडणूक आयुक्तांना पाठवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ते काल दूरचित्रवाणीवरून देशाला संबोधित करत होते.

**<><><><><>**

गाझा पट्टीत इस्रायलच्या लष्करी विस्तारासंबंधीचं वृत्त खरं असेल, तर ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचं संयुक्त राष्ट्रसंघाने म्हटलं आहे. अशा कृत्यांचे गंभीर परिणाम होऊ शकतात आणि गाझा पट्ट्यातल्या उर्वरित ओलीस नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होईल, असा इशारा संयुक्त राष्ट्रसंघाचे सहाय्यक महासचिव मिरोस्लाव जेन्का यांनी सुरक्षा परिषदेच्या बैठकीत दिला आहे.

**//<><><><><>//**